प्रेसनोट

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ठाणे |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र | ठाणे नगर पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (संशोधन २०१८)सन १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १)लोकसेवक श्री.अशोक दलपत वाघेला, वय ४५ शिपाई, गृह शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे रा.नवी मुंबई (वर्ग- ४)<br>२)नितिश सुनिल हिंगमिरे वय ३३ वर्षे, व्यवसाय–नोकरी, खाजगी इसम,रा.नाशिक<br>३)अभिषेक आनंद बडे वय २६ वर्षे, व्यवसाय–नोकरी, खाजगी इसम, रा.ठाणे |
| मागितलेलया लाचेची रक्कम | १,०५,०००/– एकूण<br>( आरोपी क्र.१ यांनी ५०००/–रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती ४५००/– स्विकारण्याचे मान्य केले व आरोपी क्र. २ याने १,००,०००/–रूपयाची मागणी करून हफ्त्याने स्विकारण्याचे मान्य केले ) |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | १९,५००/-एकूण<br>(आरोपी क्र. १ यांचे सांगणेवरून आरोपी क्र.३ यांनी ४५००/- स्विकारले व आरोपी क्र. २ यांनी पहिला हफ्ता १५,०००/- स्विकारले ) |
| थोडकयात हकीकत | यातील लोकसेवक अशोक दलपत वाघेला यांनी तक्रारदार यांचेकडे आरटीआयचे दिलेले काम लवकर करण्यासाठी ५०००/-रूपये व त्याचे झेरॉक्सचे वेगळे पैसे लागतील असे सांगून व खाजगी इसम नितेश हिंगमिरे यांनी जप्तीची ऑर्डरमध्ये मुदतवाढ देणेकामी १०००००/- रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केलेबाबत तक्रार दिनांक १६/१०/२३ रोजी दिली होती.<br>सदर तक्रारारीचे अनुषंगाने दिनांक १७/१०/२०२३ रोजी पंच साक्षिदार यांचे समक्ष केलेल्या पडताळणीत लोकसेवक श्री.अशोक वाघेला यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती ४५००/- रूपये स्विकारण्याचे कबुल करून सदरची रक्कम आरोपी नं. ३ खाजगी इसम अभिषेक बडे यांनी लोकसेवक यांच्या सांगण्यावरून स्विकारले आहेत. तसेच आरोपी नं. २ खाजगी इसम नितेश हिंगमिरे यांनी तडजोडीअंती हफ्ता-हफ्त्याने पैशे स्विकारण्याचे कबुल करून त्यातील पहिला हफ्ता १५०००/- स्विकारले आहे. वरील तीनही आरोपी यांना १६.१५ वा. रंगेहात पकडण्यात आले त्यांचेविरूध्द नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी -

१) मा. श्री. सुनिल लोखंडे सो. पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

२)मा. श्री. अनिल घेरडीकर सो. अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

**संपर्क पत्ता** :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४०० ६०१

**संकेतस्थळ** :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

**ई–मेल** :– spacbthane@ mahapolice.gov.in

**ॲप्लीकेशन** :– acbmaharashtra.net

**टोल फ्री नं.** :- १०६४

**दूरध्वनी क्र.** :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

**व्हॉटस ॲप क्र.** :- ९९३०९९७७००

(माधवी राजेकुंभार)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे